इस्त्रायलच्या पंतप्रधानांनी कॉफी घेत असतानाचा व्हिडिओ सोशल मीडियात केला शेअर, मृत्यू झाल्याच्या अफवांना

कोल्हापूरच्या पर्यटन वैभवात कागलच्या पर्यटन व नौकायन केंद्रामुळे भर

>> पान 3

चिखलीतील आठवडी बाजारात भीषण आगीमुळे ५ ते ६ दुकाने जळून खाक

>> पान 4

**सुविचार**

क्रांती हळूहळू घडते, एका क्षणात नाही.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 216 ■ सोमवार, दि. 16 मार्च 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



मुलासाठी कुणासोबत झोपावे लागले तरी... बिग बॉस फेम इन्फ्लुएंसर नेमकं काय म्हणाली?

आतील पान

# आसाम, केरळ, पुद्दुचेरीमध्ये ९ एप्रिलला; तर तामिळनाडूमध्ये २३ एप्रिलला, पश्चिम बंगालमध्ये २३-२९ एप्रिलला दोन टप्प्यांत मतदान, ४ मे रोजी निकाल जाहीर होणार

नवी दिल्ली– केंद्रीय निवडणूक आयोगाकडून पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ, आसाम आणि पुद्दुचेरी येथील विधानसभा निवडणुकांच्या तारखा जाहीर करण्यात आल्यात. या पाचही विधानसभांची मुदत मे महिन्यात संपत आहे. चार राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशातील विधानसभा निवडणुकांमध्ये एकूण मतदारांची संख्या १७.४ कोटी असून, यामध्ये ८२४ विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे. यासाठी अंदाजे २.१९ लाख मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत आणि या निवडणूक प्रक्रियेत सुमारे २५ लाख कर्मचाऱ्यांचा सहभाग असेल, असंही मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी सांगितलंय. आसाम, पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ आणि पुद्दुचेरी येथील आगामी विधानसभा निवडणुका मुक्त आणि निष्पक्ष वातावरणात पार पडतील, असे आश्वासन मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी दिलंय.

केरळमध्येही ९ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात निवडणुका घेण्यात येणार :



मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी निवडणुका होऊ घातलेल्या राज्यांमध्ये मतदार याद्यांच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षणाचे काम यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल निवडणूक आयोगाने नियुक्त केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन आणि कौतुक केले. या पत्रकार परिषदेला मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, तसेच निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी उपस्थित आहेत. आसाममध्ये ९ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात निवडणूक होणार असून, ४ मे रोजी निकाल जाहीर केला जाणार आहे. तसेच केरळमध्येही ९ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात निवडणुका घेण्यात येणार असून, निकाल ४ मे रोजी लागणार आहे. पुदुच्चेरीमध्ये ९ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात निवडणुका होणार असून, निकाल ४ मे रोजी निकाल लागेल, असंही ज्ञानेश कुमार म्हणालेत.

तामिळनाडूमध्ये २३ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात मतदान : तसेच पश्चिम बंगालमध्ये २३ आणि २९ एप्रिलला दोन टप्प्यांत मतदान होणार असून, ४ मे रोजी मतमोजणी करण्यात येणार आहे. तसेच तामिळनाडूमध्ये २३ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात मतदान होणार असून, ४ मे रोजी निवडणुकीचा निकाल जाहीर होईल. मुख्य निवडणूक आयुक्तांनी सांगितले की, ''निवडणुकांचा हा उत्सव जो आपल्यासाठी अभिमानाचा विषय आहे. आसाम, केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल आणि केंद्रशासित प्रदेश पुद्दुचेरी येथे पार पडणार आहे.''

३० हून अधिक नवीन उपक्रम हाती : मुख्य निवडणूक आयुक्तांनी सांगितले की, ''गेल्या १२ महिन्यांत भारतीय निवडणूक आयोगाने निवडणुका अधिक पारदर्शक करण्याबरोबरच मतदारांचा अनुभव अधिक सुखद करण्यासाठी आणि सर्व संबंधित घटकांना आवश्यक ती माहिती लवकरात लवकर उपलब्ध करून देण्यासाठी ३० हून अधिक नवीन उपक्रम हाती घेतलेत. या उपक्रमांपैकी पहिला उपक्रम म्हणजे विशेष संक्षिप्त पुनरीक्षण याद्वारे हे सुनिश्चित केले जाते की, कोणताही पात्र मतदार आपल्या मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहणार नाही आणि त्याच वेळी कोणताही अपात्र व्यक्ती मतदार यादीत समाविष्ट होणार नाही.'

मतदान केंद्राच्या प्रवेशद्वाराबाहेरच मोबाईल फोन जमा करण्याची सुविधा : ''या नवीन उपक्रमांपैकी एका उपक्रमांतर्गत मतदारांना त्यांचे मोबाईल फोन मतदान केंद्राच्या प्रवेशद्वाराबाहेरच जमा करण्याची सुविधा देण्यात आलीय. यामुळे मतदार आत प्रवेश करून मतदान करू शकतात, बाहेर येऊन आपले फोन परत घेऊ शकतात आणि त्यानंतर तिथून निघून जाऊ शकतात. मतदारांना त्यांच्या पसंतीच्या उमेदवाराची ओळख पटवणे सुलभ व्हावे, यासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांवर () निवडणूक लढवणाऱ्या सर्व उमेदवारांचे रंगीत छायाचित्रे प्रदर्शित केली जातील. तसेच मतदान केंद्रांवर मतदारांच्या लांबच लांब रांगा लागणे टाळण्यासाठी कोणत्याही एका मतदान केंद्रावर १२०० पेक्षा जास्त मतदारांची नोंदणी केली जाणार नाही.''

एकाच मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे माहिती उपलब्ध करून देणार : ''मतदान केंद्रापासून अगदी १०० मीटर अंतरावर उमेदवारांचे कक्ष उभारण्याची परवानगी असेल. मतदार माहिती चिठ्ठीवर मतदाराच्या मतदान केंद्राचा क्रमांक, त्यांचा यादीतील अनुक्रमांक, तसेच त्यांचा विशिष्ट भाग क्रमांक आणि अनुक्रमांक स्पष्टपणे नमूद केलेला असेल.'' ''या नवीन उपाययोजनांमधील आणखी एक महत्त्वाचा उपक्रम म्हणजे भारतीय निवडणूक आयोगाची सर्व ॲप्लिकेशन्स . आता एकाच मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे उपलब्ध करून देण्यात आली आहेत; या ॲप्लिकेशनचे नाव – असे आहे. प्रत्येक संबंधित घटकाला मग ती माहिती त्यांच्या कार्डशी संबंधित असो, मतदान केंद्राच्या तपशीलांविषयी असो, उमेदवारांविषयीची माहिती असो, उमेदवारांनी सादर केलेली प्रतिज्ञापत्रे असोत, मतदानाच्या प्रगतीविषयीचे अद्ययावत तपशील असोत किंवा मतमोजणीचे निकाल असोत सर्व प्रकारची आवश्यक माहिती या एकाच ठिकाणी उपलब्ध असेल,'' असंही ज्ञानेश कुमार म्हणालेत.

## वयाच्या ३४ व्या वर्षी 'दंगल गर्ल'ने मायानगरीत घेतलं हक्काचं घर, कोट्यवधींच्या घराची मालकीण होताच टाकली पोस्ट

**मुंबई/प्रतिनिधी** :प्रत्येक व्यक्तीचं मुंबईत स्वत:चं घर घेण्याचं स्वप्न असतं. विशेषत: प्रत्येक कलाकाराला मायानगरीत आपलं घर असावं असं कायम वाटत असतं. अनेक जण आपल्या मेहनतीने आणि परिश्रमानं हे स्वप्न साकार करतात. सध्या दंगल गर्ल सानिया मल्होत्रा या अभिनेत्रीचं स्वत:चं घर घेण्याचं स्वप्न पूर्ण झालंय. वयाच्या अवघ्या ३४व्या वर्षी तिने कोट्यावधींचा आलिशान घर घेतला आहे. आपल्या घराचे काही फोटोही तिने चाहत्यांसोबत शेअर केले आहेत. बॉलीवूडच्या दंगल चित्रपटात सान्याने बबीता फोगाटची भूमिका साकारली होती. पहिल्याच चित्रपटातून सान्या मल्होत्रा प्रचंड लोकप्रिय झाली. नंतर अनेक चित्रपटांमधून तिने आपलं अभिनय कौशल्य सिद्ध केलं आहे . कठल, शी, दंगल अशा अनेक चित्रपटांमधून दमदार अभिनयातून सान्याने बॉलीवूडमध्ये आपल्या नावाचा ठसा उमटवला. अनेक वर्षांच्या मेहनतीनंतर दंगल गर्लने मुंबईत स्वत:च नवं घर खरेदी केलं आहे. आपल्या जवळच्या मित्र परिवाराला आणि कुटुंबासमवेत तिने गृहप्रवेश केला. तिच्या नव्या घराची झलक शेअर करत आपल्या अनेक वर्षाच्या स्वप्नांना मेहनतीला आणि शिकवण आज पूर्णत्वास गेल्याच तिने पोस्टमध्ये म्हटलं आहे.

## राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांना प्रतिष्ठेचा आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर

### अमेरिकेतील 'आउटस्टँडिंग व्हिजनरी लीडर अँड ट्रू चेंजमेकर' पुरस्कार

**दैनिक आपला विदर्भ**

मुंबई दि. १५ : राज्याच्या ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक आरोग्य आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांना अमेरिकेतील U.S. India SME Council, Washington DC तर्फे 'आउटस्टँडिंग व्हिजनरी लीडर अँड ट्रू चेंजमेकर' हा प्रतिष्ठेचा आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

हा पुरस्कार १४ मार्च २०२६ रोजी जाहीर करण्यात आला असून त्यांचा सत्कार २५ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता नवी दिल्ली येथील भारत मंडपममध्ये आयोजित विशेष समारंभात करण्यात येणार आहे.

राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी महाराष्ट्रात विशेषतः परभणी जिल्ह्यात ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबवले आहेत. महिला उद्योजकांना प्रोत्साहन, लखपती दीदी योजना, ग्रामीण महिलांसाठी सिल्क अँड मिल्क उपक्रम, तसेच एकल महिला सशक्तीकरण अभियान यांसारख्या योजनांद्वारे महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत.



महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर करण्यात आल्याची माहिती परिषदेत देण्यात आली आहे.

अमेरिका-भारत आर्थिक सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठी कार्यरत असलेली U.S. India SME Council ही संस्था लघु व मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देणे, नाविन्यपूर्ण उद्योजकता वाढविणे तसेच पायाभूत सुविधा, ऊर्जा, शाश्वत विकास, आरोग्य आणि ग्रामीण विकास अशा विविध क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढविण्यासाठी काम करते.

## इराण संघर्षात अडकलेल्या ट्रम्प यांच्यासाठी आनंदाची बातमी! व्हेनेझुएलामधील अमेरिकन दूतावासावर ७ वर्षांनंतर अमेरिकन ध्वज फडकला

कॅराकास : अमेरिका सध्या इराणसोबतच्या तीव्र संघर्षात गुंतलेली आहे. या संघर्षात अमेरिकेच्या अनेक सैनिकांना आपला जीव गमवावा लागलाय. दरम्यान, इराणने मध्यपूर्वेतील अमेरिकेचे अनेक लष्करी तळ उद्ध्वस्त केलेत. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासाठी एक दिलासादायक बातमी आहे. २०१९ नंतर पहिल्यांदाच व्हेनेझुएलामधील अमेरिकन दूतावासावर अमेरिकन ध्वज फडकवण्यात आलाय. या कृतीतून दोन्ही देशांमधील संबंधांमध्ये अलीकडे झालेला बदल दिसून येतो, हा बदल जानेवारीमध्ये अमेरिकन सैन्याने माजी राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांना पकडण्याचा प्रयत्न केल्यापासून निदर्शनास येतोय. सात वर्षांनी तो पुन्हा फडकवण्यात आलाय : अमेरिकन दूतावास पुन्हा सुरू करण्याचा निर्णय राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या विधानांच्या मालिकेचा परिणाम आहे. या विधानांमध्ये त्यांनी मादुरो यांचे उत्तराधिकारी आणि कार्यवाहक राष्ट्राध्यक्ष डेल्सी रॉड्रिग्ज यांना पाठिंबा दर्शवला होता. डेल्सी रॉड्रिग्ज यांनी अमेरिकन सरकारशी संवाद कायम राखण्यासाठी सक्रिय प्रयत्न केलेत. सोशल मीडिया वाहिन्यांवरील प्रसिद्ध निवेदनात, अमेरिकन दूतावासाच्या पथकाने नमूद केले की, ''ध्वज खाली उतरवण्यात आल्यानंतर बरोबर सात वर्षांनी तो पुन्हा फडकवण्यात आलाय.'' दूतावास पुन्हा सुरू झाल्याच्या घटनेने स्थानिक रहिवाशांचे लक्ष त्वरित वेधून घेतले.




# मुक्त शिक्षण प्रणालीमुळे शिक्षणापासून वंचित विद्यार्थ्यांना संधी मिळण्यास मदत –मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### एज्युकेट गर्ल्स संस्थेसोबत शासनाचा सामंजस्य करार

**दैनिक आपला विदर्भ**

मुंबई, दि. १५ मार्च राज्यातील एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये ही राज्य शासनाची भूमिका आहे. 'एज्युकेट गर्ल्स'सारख्या अनुभवी संस्थेच्या सहकार्यामुळे राज्य मुक्त शाळा प्रणाली अधिक बळकट होईल आणि शिक्षण अर्धवट राहिलेल्या विशेषतः मुलींना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात येण्याची संधी मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

राज्यातील मुक्त शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आणि औपचारिक शिक्षण प्रणालीमधून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना लवचिक शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या पुढाकाराने शालेय शिक्षण विभागाने 'एज्युकेट गर्ल्स' संस्थेशी नुकताच सामंजस्य करार केला आहे.

राज्यात प्रत्येकाला शालेय शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे कायम आग्रही आहेत. यादृष्टीने शालेय शिक्षण विभागामार्फत पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या खाजगी संस्थांना देखील नोंदणी करणे बंधनकारक करण्यात येत आहे. पूर्व प्राथमिक ते माध्यमिक शिक्षणापर्यंत विद्यार्थी संख्या कायम राहावी यासाठी शासनामार्फत विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. तथापि कोणत्याही कारणास्तव शालाबाह्य झालेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा मुख्य प्रवाहात आणण्यासाठी देखील प्रयत्न करण्यात येत आहेत. मुख्यमंत्र्यांनी या बाबीला प्राधान्य दिले असल्याने विशेषत: शिक्षणापासून दूर राहिलेल्या मुली, महिला यांना या कराराचा विशेष लाभ होणार आहे.

'एज्युकेट गर्ल्स' ही आशियातील सर्वोच्च सन्मान मानल्या जाणाऱ्या रमण मॅगसेसे पुरस्काराने गौरविण्यात आलेली संस्था असून मुलींच्या शिक्षणासाठी प्रभावी कार्य करणाऱ्या अग्रगण्य स्वयंसेवी संस्थांपैकी एक आहे. मुख्यमंत्र्यांच्या दूरदृष्टीमुळे या संस्थेसमवेत झालेल्या या करारामुळे राज्यातील मुक्त शिक्षण प्रणाली अधिक बळकट करण्यासाठी धोरणात्मक मार्गदर्शन आणि तांत्रिक सहाय्य उपलब्ध होणार आहे. या भागीदारी अंतर्गत महाराष्ट्र राज्य मुक्त शाळा मंडळाला सहाय्य करण्यासाठी 'टेक्निकल असिस्टन्स युनिट' स्थापन करण्यात येणार आहे. या माध्यमातून जनजागृती मोहिमा राबविणे, वंचित समुदायांपर्यंत पोहोचणे, तसेच दहावी व बारावीचे शिक्षण पूर्ण न केलेल्या विद्यार्थ्यांची ओळख पटवून त्यांना पुन्हा शिक्षणात सामावून घेण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यास मदत केली जाणार आहे.



या उपक्रमात विशेषतः मुली, महिला विद्यार्थी तसेच सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित घटकांपर्यंत पोहोचण्यावर भर दिला जाणार आहे. त्याचप्रमाणे मुक्त शिक्षण प्रणाली अधिक सक्षम करण्यासाठी शैक्षणिक संसाधने आणि तंत्रज्ञानाधारित शिक्षण व्यवस्था विकसित करण्याबरोबरच मुक्त शिक्षण कार्यक्रमांची गुणवत्ता सुधारण्यासाठी नवकल्पनात्मक पद्धती विकसित करण्यात येतील. याशिवाय विद्यार्थ्यांना विविध शासकीय योजना, शिष्यवृत्ती, शुल्क सवलती तसेच कौशल्याधारित अभ्यासक्रमांशी जोडण्याच्या संधींचाही शोध घेतला जाणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या रोजगारक्षमतेत वाढ होण्यास मदत होणार असून त्यांना पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळेल, अशी भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यानिमित्ताने व्यक्त केली आहे.

## आरवाती संघर्ष नेमका कुठे जाणार....

पश्चिम आशियातील सध्याची परिस्थिती हा इतिहास, साम्राज्यवाद, धर्म, तेल-राजकारण, प्रादेशिक सत्ता आणि जागतिक अर्थकारण यांच्या गुंतागुंतीतून उभा राहिलेला दीर्घकालीन संघर्ष आहे. आज अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील तणावाची बीजे २०व्या शतकाच्या मध्यात पेरली गेली. पश्चिम आशियातील या सगळ्या परिस्थितीचा उदय हा इतिहास, वांशिकता, संसाधने आणि बाह्य हस्तक्षेप यांच्याच संगमातून झालेला आहे. २०व्या शतकाच्या मध्यावर इराणमध्ये पंतप्रधान मोहम्मद मोसद्देक यांच्या नेतृत्वामध्ये राष्ट्रवाद आणि लोकशाहीची एक सशक्त राजकीय चळवळ उभी राहिली. इराणची प्रचंड तेलसंपत्तीवरील परकीय कंपन्यांचा ताबा राष्ट्रीय स्वाभिमानाला बाधक आहे, अशी त्यांची ठाम भूमिका होती. त्याकाळी इराणी तेल-उद्योगावर मुख्यतः ब्रिटिश कंपन्यांचे वर्चस्व होते आणि यामुळे इराणी समाजात नाराजी वाढत होती. त्यामुळे मोसद्देक यांनी तेल-उद्योगाच्या राष्ट्रीयीकरणाचा धाडसी निर्णय घेतला. हा निर्णय ब्रिटनसाठी मोठा धक्काच ठरला. वास्तविक इराणचे तेल ब्रिटनच्या आर्थिक हितसंबंधांचा महत्त्वाचा भाग होते. परिणामी, ब्रिटनने इराणवर आर्थिक दबावासाठी अमेरिकेची मदत मागितली. अखेरीस १९५३ साली ब्रिटन आणि अमेरिकेच्या गुप्त कारवायांमधून इराणमध्ये सत्तांतर घडवण्यात आले; तेच 'ऑपरेशन अजॅक्स' होय. यामुळे लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या मोसद्देक सरकारचा अंत झाला आणि राजेशाहीला बळ मिळाले. त्यानंतर मोहम्मद रझा पहलवी या शाहा राजवटीला अमेरिकेने पूर्ण पाठिंबा दिला. शाहांनी देशात औद्योगिकीकरण आणि आधुनिकीकरणाचे कार्यक्रम राबवतानाच, विरोधकांवर कठोर दडपशाहीदेखील केली. परिणामी भीतीच्या वातावरणामुळे इराणी जनतेतील असंतोष दिवसेंदिवस वाढत गेला. याच कालखंडात पश्चिमेकडील शक्तींनी, इराणला पश्चिम आशियातील आपला विश्वासू मित्रदेश बनवण्याचा प्रयत्न केला. मात्र, लोकशाहीचा झालेला अंत आणि राजेशाहीच्या वाढत्या धाकामुळे इराणी समाजाच्या मनात रोष निर्माण झाला होता. याचेच परिणाम पुढील दशकातील मोठ्या राजकीय उलथापालथीत दिसून आले. १९७९ सालातील इराणमधील 'इस्लामी क्रांती' ही दीर्घकाळाचे संचित असलेल्या सामाजिक, राजकीय आणि राष्ट्रीय असंतोषाची ग्वाही ठरली. त्याकाळी इराणवर पहलवी घराण्याची सत्ता होती आणि शाह मोहम्मद रझा पहलवी यांच्या राजवटीला पाश्चिमात्य देशांचा, विशेषतः अमेरिकेचा पाठिंबा होता. या राजवटीने आधुनिकीकरणाच्या नावाखाली काही बदल करताना, विरोधी मतांनाही कठोरपणे दडपले. पहलवी राजवटीची गुप्त पोलीस यंत्रणा 'सावक' ही त्यांच्या दडपशाहीचे प्रमुख साधन ठरली. 'सावक'चे अधिकारी राजकीय विरोधकांवर नजर ठेवत, त्यांना अटक करत आणि अनेकदा अमानुष छळही करत. विद्यार्थी, कामगार संघटना, वैचारिक कार्यकर्ते, तसेच धार्मिक विद्वान अशा सर्वांवरच या यंत्रणेची नजर होती. त्यामुळेच इराणमध्ये दीर्घकाळ दडपशाहीचे वातावरण निर्माण झाले. या परिस्थितीत धार्मिक नेते अयातुल्ला रुहोल्लाह खोमेनी यांनी, शाह राजवटीविरुद्ध आवाज उठवला. देशाबाहेर राहून त्यांनी जनतेला संघटित केले. शेवटी १९७९ मधल्या जनआंदोलनाने शाहांच्या सत्तेचा डोलारा कोसळला. यानंतर इराणमध्ये 'इस्लामी प्रजासत्ताका'ची स्थापना झाली आणि धार्मिक नेतृत्वाला राज्यकारभारात केंद्रस्थान मिळाले. या क्रांतीनंतर लगेचच तेहरानमधील अमेरिकन दूतावासातील कर्मचाऱ्यांना बंधक बनवण्यात आले. या घटनेने इराण आणि अमेरिकेमधील संबंधांमध्ये मिठाचा खडा पडला आणि पश्चिम आशियातील राजकारणाला एक नवे वळण लाभले. पश्चिम आशियातल्या तेलसंपत्तीवरील नियंत्रणासाठी, जागतिक महासत्तांनी अनेकदा प्रादेशिक वैराला चिथावणी दिली. इराणमधील 'इस्लामी क्रांती'नंतर लगेचच शेजारील इराकने सद्दाम हुसेन यांच्या नेतृत्त्वात इराणवर आक्रमण केले. आठ वर्षे चाललेले हे युद्ध अत्यंत विध्वंसक ठरले. नव्या 'इस्लामी क्रांती'चा प्रभाव अन्यत्र पसरेल या भीतीने, अनेक पाश्चिमात्य देशांनी इराकला अप्रत्यक्ष मदत केली. इराणसाठी हा संघर्ष त्यांच्या नव्या क्रांतिकारी धार्मिक ओळखीचा आणि स्वाभिमानाचे रक्षण करण्यासाठीचा होता. या युद्धातून इराणने एक महत्त्वाचा धडा घेतला, तो म्हणजे देशाच्या सुरक्षेसाठी फक्त पारंपरिक सैन्यावर अवलंबून राहणे योग्य ठरणार नाही. 'इस्लामी क्रांती'नंतर इराणमध्ये नव्या व्यवस्थेच्या रक्षणासाठी 'इस्लामी क्रांतिरक्षक दल' अर्थात, 'आयआरजीसी' अधिक शक्तिशाली करण्यात आले. या दलाची भूमिका बाह्य शत्रूंशी लढण्याबरोबरच, देशाच्या आत इस्लामी व्यवस्थेविरुद्ध कोणतेही बंड उभे राहू नये, यावरही बारकाईने लक्ष ठेवण्याची होती. क्रांतीनंतरच्या काळात इराणने स्वयंपूर्ण संरक्षण व्यवस्थेची गरज ओळखली. यातूनच क्षेपणास्त्र तंत्रज्ञान, मानवरहित यंत्रे आणि विविध लष्करी साधनांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरू झाले. या धोरणामागे दोन स्पष्ट उद्दिष्टे होती- पहिले म्हणजे पश्चिमी शक्ती आणि विशेषतः अमेरिकेच्या नेतृत्वाखालील आघाडीचा दबाव रोखणे आणि दुसरे म्हणजे संपूर्ण पश्चिम आशियात शक्तिसंतुलन आपल्या बाजूने ठेवणे. इराणने पश्चिम आशियातील राजकारणातील भूमिकेच्या बळकटीकरणासाठी, विचारसरणीने जवळ असलेले मित्रगट उभारण्याची नीती स्वीकारली. या व्यापक जाळ्याला अनेक अभ्यासक 'प्रतिकार अक्ष' संबोधतात. या गटात लेबनॉनमधील 'हिझबुल्ला', पॅलेस्टाईनमधील 'हमास' आणि येमेनमधील 'हुती' यांसारख्या संघटनांचा समावेश होता. इराणच्या दृष्टीने या संघटना लष्करी सहकार्य करणाऱ्या गटांबरोबरच, प्रादेशिक राजकारणातील संतुलन साधण्याची साधने ठरल्या. पश्चिम आशियातील अमेरिका आणि तिच्या मित्रदेशांचा वाढता प्रभाव रोखण्यासाठी या संघटनांशी राजकीय, आर्थिक आणि लष्करी संबंध दृढ ठेवले जातात. याच माध्यमातून इराण स्वतःचे रणनीतिक प्रभुत्व वाढवण्याचा प्रयत्न करतो. कोणताही संघर्ष थेट आपल्या सीमांवर न येता, विविध प्रदेशांत विखुरलेला राहावा; तसेच आपल्या विरोधकांवर दबाव टिकून राहावा, अशी ही नीती असल्याचे अनेक तज्ज्ञ मानतात.

# इस्त्रायलच्या पंतप्रधानांनी कॉफी घेत असतानाचा व्हिडिओ सोशल मीडियात केला शेअर, मृत्यू झाल्याच्या अफवांना पूर्णविराम

**दैनिक आपला विदर्भ**

तेल अवीव - इस्त्रायलचे पंतप्रधान नेतन्याहू यांचा मृत्यू झाल्याच्या पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. अशातच मृत्यूचे दावे खोटे आहेत, हे सिद्ध करण्याकरिता बेंजामिन नेतन्याहू यांनी सोशल मीडियावर कॉफी घेत असल्याचा व्हिडिओ पोस्ट केला.

इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी सोशल मीडियावर एक विनोदी व्हिडिओ शेअर केला आहे. यामध्ये त्यांनी त्यांच्या मृत्यूबद्दल पसरणाऱ्या अफवांवर टीका केली आहे. व्हिडिओमध्ये ते तेल अवीवमधील एका कॅफ मध्ये दिसत आहेत. त्यामध्ये हिब्रू भाषेत कॉफी ऑर्डर करताना दिसत आहेत. व्हिडिओसोबतच्या सबटायटल्समध्ये असे लिहिले आहे की, ''लोक म्हणत आहेत... माझे काय?'' ते हलक्याफुलक्या गमतीजमती करताना दिसत आहेत. विनोदानं युद्ध, इराणशी असलेले तणाव आणि त्यांच्या कॉफीच्या कॅलरीजची संख्या धोकादायक असल्याचं म्हणताना दिसत आहेत.

इस्त्रायल-इराण संघर्षादरम्यान नेतन्याहू यांच्या मृत्यूबद्दल - किंवा हल्ल्यात जखमी झाल्याबद्दल - सोशल मीडियावर वेगानं पसरत असताना हा व्हिडिओ समोर आला आहे. काही वापरकर्त्यांनी त्यांच्या अलीकडील पत्रकार परिषदेच्या व्हिडिओमध्ये सहा बोटे दिसल्याचा




दावा करून या अफवांना वेग दिला. इराणच्या सोशल मीडिया अकाउंटवरून बेंजामिन नेतन्याहू यांचा मृत्यू झाल्याचे दावे करण्यात आले आहेत. त्यानंत इस्त्रायलचे पंतप्रधान नेतन्याहू कॉफी पिताना आणि त्यांची पाच बोटे दाखवताना एक व्हिडिओ सोशल मीडियात पोस्ट केला. ने

अनाडोलू एजन्सीच्या एका प्रतिनिधीनं नेतन्याहू यांच्या कार्यालयाला हत्येबाबत होत असलेल्या दाव्यांबाबत स्पष्टीकर विचारले. त्यावर नेतन्याहू यांच्या कार्यालयानं हे वृत्त फेटाळून लावत म्हटलं आहे की, ''ही बातमी खोटी आहे. पंतप्रधान ठीक आहेत.'' शुक्रवारी इस्त्रायलच्या पंतप्रधानांनी अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यातील सुरू असलेल्या संघर्षावर चर्चा करणाऱ्या पत्रकार परिषदेचा व्हिडिओ पोस्ट केल्यानंतर त्यांच्या मृत्यूच्या पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. नेतन्याहू यांचा व्हिडिओ एआय जनरेटेड आहे, असा काही वापरकर्त्यांनी दावा करत त्यांच्या उजव्या हाताला सहा बोटे दिसत असल्याचं म्हटलं होतं.

एक्सच्या एआय चॅटबॉट, ग्रोकनुसार नेतन्याहूला सहा बोटे नाहीत. मात्र, त्यांच्या व्हिडिओमध्ये सहा बोटे दिसत असल्यानं संशय निर्माण झाला होता. २८ फेब्रुवारी रोजी इराणवर इस्त्रायल आणि अमेरिकेनं हल्ला केल्यानंतर तीन देशामध्ये प्रचंड संघर्ष निर्माण झाला. इस्त्रायल आणि अमेरिकेनं इराणवर केलेल्या संयुक्त हल्ल्यात इराणचे तत्कालीन सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाला.

# देशाची अन्नसुरक्षा, आर्थिक स्थैर्यासाठी कृषी क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची : राज्यपाल जिष्णुदेव वर्मा

- महात्मा फुले कृषी विद्यापीठाचा ३९ वा पदवीप्रदान समारंभ संपन्न
- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मानद 'डॉक्टर ऑफ सायन्स' पदवीने सन्मानित






अहिल्यानगर, दि. १५ : जगातील एका भागातील युद्ध व संघर्षाचा परिणाम सर्वत्र होत असल्याने देशाची कृषी व्यवस्था अधिक सक्षम करणे व अन्नसुरक्षा सुनिश्चित करणे अत्यंत आवश्यक आहे. देशाच्या अन्नसुरक्षा, आर्थिक स्थैर्य व शाश्वत विकासासाठी कृषी क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून भारतीय कृषीचे भविष्य तंत्रज्ञानाधारित उपाय, स्टार्टअप्स व शाश्वत पद्धतींवर अवलंबून आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल व महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलपती जिष्णु देव वर्मा यांनी केले.

राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात आयोजित ३९ व्या पदवीप्रदान समारंभात ते बोलत होते. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राज्यपालांच्या हस्ते 'डॉक्टर ऑफ सायन्स' या मानद पदवीने सन्मानित करण्यात आले.

यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील व कृषिमंत्री तथा विद्यापीठाचे प्रतिकुलपती दत्तात्रय भरणे यांची प्रमुख उपस्थिती होती. नवी दिल्ली येथील भारतीय कृषी संशोधन संस्थेचे (आयसीएआर) माजी संचालक डॉ. अशोक कुमार सिंह, कुलगुरू डॉ. विलास खर्चे व राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे उपस्थित होते.

राज्यपाल श्री. वर्मा म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'जय जवान, जय किसान, जय विज्ञान' याबरोबरच 'जय अनुसंधान' घोषणा दिली आहे. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी हे अत्यंत महत्त्वाचे आहे. हवामान बदल, तांत्रिक प्रगती व बदलते जागतिक परिदृश्य यामुळे कृषी क्षेत्रात दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व व नवकल्पनांची गरज आहे. नैसर्गिक व शाश्वत शेती पद्धतींच्या प्रसारात तसेच देशातील पहिले 'रिमोट पायलट ट्रेनिंग ऑर्गनायझेशन' स्थापन करण्यात विद्यापीठाने घेतलेला पुढाकार कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या विद्यापीठात होत असलेल्या प्रभावी अंमलबजावणीबाबत समाधान व्यक्त करून राज्यपाल म्हणाले, विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता कृषी नवकल्पना व उद्योजकता स्वीकारावी. राज्य शासन कृषी क्षेत्रातील नवकल्पना व ग्रामीण विकासासाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्यास कटिबद्ध आहे, असेही त्यांनी नमूद केले.

**शाश्वत शेतीसाठी कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर संशोधनाची आवश्यकता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, मागील दहा वर्षांत शेती क्षेत्रात मूलगामी बदल करण्याचे काम शासनाने केले आहे. पायाभूत सुविधांमध्ये शाश्वत बदल करून कृषी क्षेत्रात गुंतवणूक वाढविता येईल. पावसाचा पडणारा थेंब अन् थेंब साठविला पाहिजे, यासाठी शासनाने जलयुक्त शिवार योजना आणली; ज्यामुळे महाराष्ट्रात भूजल पातळी वाढली. 'मागेल त्याला शेततळे' योजनेच्या अंमलबजावणीत अहिल्यानगर जिल्हा अग्रेसर राहिला आहे. शेतकऱ्यांना पाणी सुरक्षेबरोबर वीज सुरक्षेसाठी मुख्यमंत्री सौर कृषी योजना सुरू करण्यात आली आहे. या वर्षाच्या अखेरीस शासन १४ हजार मेगावॉट वीज निर्माण करणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना दिवसा १२ तास मोफत वीज मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, वातावरण बदलामुळे कृषी क्षेत्रात सर्वाधिक तंत्रज्ञानाची आवश्यकता आहे. देशात 'ॲग्रीस्टॅक' योजनेत सर्वाधिक १ कोटी ३० लाख शेतकऱ्यांना डिजिटल ओळख दिली आहे. हा डेटा वापरून कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे कृषी क्षेत्रात आमूलाग्र बदल केले जाणार आहेत. महाविस्तार ॲपद्वारे शेतकऱ्यांना सल्ला दिला जात आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे २५ टक्क्यांपर्यंत उत्पादन खर्च कमी होत असून ५० टक्के उत्पादन वाढत आहे. शेतकऱ्यांना कर्जातून मुक्त करण्यासाठी शाश्वत शेतीचे मॉडेल उपयोगी येणार आहे. कृषी क्षेत्रात आपल्याला पुढील दहा वर्षांत अजून खूप परिवर्तन करायचे आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

कृषी क्षेत्रातील बदलासाठी कृषी विद्यापीठे, राज्य शासन यासोबतच कृषी पदवीधर यांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. नैसर्गिक शेतीला पुढे नेणे आवश्यक असून केमिकलचा वापर कमी करणे आवश्यक आहे. माती खराब होणार नाही मोठ्या प्रमाणात संशोधन होत असून ते शेतकऱ्यांपर्यंत पोहचवले पाहिजे. अल्पभूधारक शेतकऱ्यांना डोळ्यासमोर ठेवून काम केले तर त्याचा चांगला बदल दिसेल. उत्पादन खर्च कमी करून मूल्यसाखळी तयार करावी लागणार आहे. कृषी तंत्रज्ञानावर आधारित उद्योग कसे वाढवता येतील यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

कृषी मंत्री श्री. भरणे म्हणाले, कृषी विद्यार्थ्यांकडून कुटुंब, समाजाच्या खूप अपेक्षा आहेत. विद्यार्थ्यांनी नोकरीच्या मागे न लागता नोकरी देणारे कृषी उद्योजक व्हावे. कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर केल्याशिवाय आता पर्याय नाही. त्यादृष्टीने आता आपण संशोधन केले पाहिजे.

डॉ. अशोक कुमार सिंग म्हणाले, देशाच्या अर्थव्यवस्थेत व रोजगारात कृषी क्षेत्राचा सिंहाचा वाटा असून, हरितक्रांती व तंत्रज्ञानाच्या पाठबळामुळे देशाच्या अन्नधान्य उत्पादनात अभूतपूर्व वाढ झाली आहे. शेती हा केवळ एक व्यवसाय नसून ती मानवतेची सेवा आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी संशोधन, प्रशासन, कृषी उद्योग किंवा इतर कोणत्याही क्षेत्रात काम करताना आपले ज्ञान केवळ स्वतःपुरते मर्यादित न ठेवता शेतकरी व ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी समर्पित करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी विद्यापीठाचा अहवाल सादर केला. त्यांनी विद्यापीठाने आतापर्यंत विकसित केलेले तंत्रज्ञान, पिकांचे वाण व नैसर्गिक शेतीमधील योगदानाची माहिती दिली. विद्यापीठाने गेल्या पाच दशकांत दीड लाखांहून अधिक कुशल मनुष्यबळ तयार केले असून ३२० उच्च उत्पादनक्षम पिकांच्या जाती, ५६ कृषी अवजारे विकसित केली आहेत तसेच ६ हजार २८४ वनस्पती आनुवंशिक संसाधनांचे संवर्धन केले असल्याची माहिती त्यांनी दिली.

या पदवीप्रदान समारंभात राज्यपाल श्री. वर्मा यांच्या हस्ते विविध विद्याशाखांतील एकूण ४ हजार ६०२ स्नातकांना पदव्या प्रदान करण्यात आल्या. यामध्ये ४ हजार १८२ स्नातकांना पदवी, ३४६ स्नातकांना पदव्युत्तर पदवी तर ७४ स्नातकांना आचार्य (पीएच.डी.) पदवीने अनुग्रहित करण्यात आले. तसेच शैक्षणिक वर्षात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ४२ यशस्वी स्नातकांना मान्यवरांच्या हस्ते सुवर्णपदके व रोख पारितोषिके प्रदान करून गौरविण्यात आले.

या कार्यक्रमास आमदार मोनिकाताई राजळे, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्र मणी, अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलसचिव राजेंद्र कुमार पाटील, विविध अधिकारी, विद्यापीठ कार्यकारी परिषद व विद्यापरिषदेचे सदस्य, माजी कुलगुरू, प्राध्यापकवर्ग, अधिकारी, विद्यार्थी, पालक व प्रगतशील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### कराडमध्ये ५० फूट विहिरीत पडलेल्या रानगव्याचे थरारक रेस्क्यू

दैनिक आपला विदर्भ





सातारा/प्रतिनिधी : तालुक्यातून एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. गावच्या हद्दीत तब्बल ५० फूट खोल विहिरीत पडलेल्या रानगव्याला वनविभाग आणि रेस्क्यू टीमने सुरक्षित बाहेर काढत यशस्वी बचावकार्य केले आहे.

कराड तालुक्यातील धोंडेवाडी येथे एक रानगवा तब्बल ५० फूट खोल विहिरीत पडल्याची घटना घडली. ही बाब स्थानिक ग्रामस्थांच्या लक्षात येताच परिसरात एकच खळबळ उडाली आणि तात्काळ वनविभागाला माहिति देण्यात आली. माहिती मिळताच सातारा उपवनसंरक्षक आणि सहाय्यक वनसंरक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली कराड वनपरिक्षेत्र अधिकारी व वन कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले.यानंतर क्रेन आणि मजबूत दोरखंडांच्या सहाय्याने रानगव्याला बाहेर काढण्यासाठी रेस्क्यू ऑपरेशन सुरू करण्यात आले. तब्बल चार ते पाच तास सुरू असलेल्या या बचाव मोहिमेला अखेर रात्री साडेसात वाजण्याच्या सुमारास यश आले आणि रानगव्याला सुरक्षितपणे विहिरीबाहेर काढण्यात वनविभागाला यश आले.रेस्क्यू केल्यानंतर रानगव्याची तपासणी करण्यात आली. तो सुरक्षित असल्याची खात्री करून त्याला पुन्हा त्याच्या नैसर्गिक अधिवासात सुखरूप सोडण्यात आले.या धाडसी आणि तत्पर कारवाईमुळे एका वन्यप्राण्याचे प्राण वाचले असून वनविभागाच्या या कार्याचे स्थानिक नागरिकांकडून कौतुक होत आहे.

### मोदीजी सगळं नीट करतील विश्वास ठेवा, गॅस टंचाईबाबत फडणवीसांकडून नागरिकांना आश्वस्त करण्याचा प्रयत्न

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील गॅस टंचाई दिवसेंदिवस चिंताजनक स्वरुप धारण करत असल्यामुळे अनेक सामान्य नागरिकांना समस्यांना सामोरे जावे लागत आहे. राज्य सरकारकडून राज्यातील एलपीजी गॅस पुरवठा दावा सुरळीत असल्याचा दावा केला जात असला तरी प्रत्यक्षात गॅस एजन्सीजकडून सिलेंडरचे बुकिंग घेण्यात दिरंगाई होत असल्याचे चित्र आहे. यामुळे घरातील गॅस संपण्याच्या भीतीने अनेकजण गॅस एजन्सीबाहेर रांगा लावताना दिसत आहेत.

या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा एकदा राज्यातील नागरिकांना आश्वस्त करण्याचा प्रयत्न केला. राज्यात गॅसची कोणतीही टंचाई नाही. केंद्र आणि राज्य सरकारवर विश्वास ठेवा, असे वक्तव्य देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. ते रविवारी राहुरी येथे प्रसारमाध्यमांशी बोलत होते. देवेंद्र फडणवीसांनी गॅसच्या तुटवड्यावरुन चिंता करण्याचे कारण नसल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट केले.

# कोल्हापूरच्या पर्यटन वैभवात कागलच्या पर्यटन व नौकायन केंद्रामुळे भर

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विविध विकासकामांचे लोकार्पण



दैनिक आपला विदर्भ

कोल्हापूर, दि. १५ : कागल शहराच्या सौंदर्यात आणि पर्यटन वैभवात भर घालणाऱ्या कै. व्हि. ए. घाटगे पर्यटन व नौकायन केंद्र (पाझर तलाव) परिसरातील दुसऱ्या टप्प्यातील विविध विकासकामांचे लोकार्पण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज अत्यंत उत्साहात संपन्न झाले. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'कृत्रिम कासव आकाराचा धबधबा' आणि 'रेनडान्स'चे लोकार्पण करण्यात आले, तसेच पर्यटकांच्या निवासासाठी प्रस्तावित असलेल्या भव्य 'लेक व्ह्यू रिसॉर्ट'चे भूमिपूजनही करण्यात आले. कागल नगरपरिषदेच्या या नाविन्यपूर्ण प्रकल्पामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यटनाला मोठी चालना मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. कार्यक्रमस्थळी मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांचा नगरपालिकेच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला.

१५ कोटींच्या या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले होते. झालेल्या कामांबाबत यावेळी चित्रफीत दाखवण्यात आली. आजच्या सोहळ्याला विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, खासदार धनंजय महाडिक, आमदार विनय कोरे, आमदार अमल महाडिक, जिल्हाधिकारी अमोल येडगे, जिल्हा पोलीस अधीक्षक योगेश कुमार, कोल्हापूर महापालिका आयुक्त के. मंजुलक्ष्मी, कागल नगराध्यक्ष सविता माने, उपनगराध्यक्ष जयवंत रावण, माजी आमदार संजयबाबा घाटगे, अखिलेशराजे घाटगे, प्रांताधिकारी प्रसाद चौगुले, मुख्याधिकारी अजय पाटणकर यांच्यासह कागल नगरपालिकेचे सर्व लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

कागल नगरपरिषदेने 'नाविन्यपूर्ण योजना २०२४-२५' अंतर्गत कामांच्या टप्पा दोन मध्ये सुमारे १ कोटी ६९ लाख रुपये खर्चून म्युजिकल सिस्टिमसह हा कासव आकाराचा धबधबा विकसित केला आहे. तसेच, 'महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान २०२५-२६' अंतर्गत सुमारे ४ कोटी रुपये खर्चून 'लेक व्ह्यू रिसॉर्ट' उभारले जाणार आहे. दररोज सरासरी एक हजार पर्यटकांची होणारी गर्दी लक्षात घेता, येथे पर्यावरणपूरक उपाययोजना म्हणून पाण्याचे रिसायकलिंग, सोलर पार्क आणि मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले आहे. या सर्व सोयीसुविधांमुळे कागलचा पाझर तलाव परिसर आता जागतिक दर्जाचे पर्यटन केंद्र म्हणून नावारूपास येत आहे.

## नाशिकच्या सिंहस्थ कुंभ मेळ्यात फक्त हिंदूंचीच दुकानं हवी

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिक जिल्ह्यात २०२७ मध्ये होणार असलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्यात फक्त हिंदूंचीच दुकानं हवी. कुंभमेळ्याला हजेरी लावणाऱ्यांनी याच दुकानांतून खरेदी करण्याला प्राधान्य द्यावे. सिंहस्थ कुंभमेळ्यात जर कोणी मुसलमान दुकान लावण्याचा प्रयत्न करत असेल तर ते दुकान उखडून टाका असा इशारा भाजप नेते नितेश राणे यांनी दिली. ते नाशिकमध्ये हिंदू हित रक्षातर्फे आयोजित नित्य गरजांना आवश्यक अशा शेकडो हिंदू कारागीर व लघु व्यावसायिकांच्या यादीचे प्रकाशन व लोकार्पण सोहळ्यात बोलत होते. याप्रसंगी नितेश राणे 'हिंदूंचा रुपया हिंदूलाच' या विषयावर बोलले. हिंदू व्यक्तीने त्याच्या गरजेच्या वस्तू आणि सेवांची खरेदी करताना हिंदू व्यवसायिकालाच प्राधान्य द्यावे, असे भाजप नेते नितेश राणे म्हणाले. याप्रसंगी मंचावर कामाख्या देवीचे कालीचरण महाराज, आमदार सीमा हिरे, हिंदू हित रक्षाचे प्रवीण जोशी उपस्थित होते.

भारतात हिंदूंच्या बाजूने आणि हिंदूंच्या हितासाठी बोलायचे नाही तर काय पाकिस्तानमधील इस्लामाबादमध्ये जाऊन बोलायचे ? असा प्रश्न भाजप नेते नितेश राणे यांनी उपस्थित केला. त्यांना 'गजवा - ए - हिंद'च्या माध्यमातून २०४७ पर्यंत भारताला इस्लामिक राष्ट्र बनवायचे आहे. पण आम्ही हे कधीच होऊ देणार नाही. यासाठी सर्व हिंदूंनी एकत्र येण्याची गरज आहे. आपण सतर्क आणि जागरूक राहायला पाहिजे. कुणाच्याही जन्म आणि मृत्यू प्रमाणपत्रावर हिंदू असे लिहिलेले असते, त्यावर मंत्री किंवा आमदार असे लिहिलेले नसते. त्यामुळे शेवटच्या श्वासापर्यंत मी हिंदूसाठी उभा आहे. आज जर आपण हिंदू म्हणून एकत्र आलो नाही तर पुढची पिढी आपल्याला माफ करणार नाही, असे मंत्री नितेश राणे म्हणाले.

आम्ही हिंदुत्ववादी विचाराचे सरकार निवडून देण्यासाठी तुमच्याकडे आलो होतो आणि तुम्ही हिंदुत्ववादी सरकार निवडून दिले. त्यावेळी आम्ही आश्वासन दिले होते की, आम्ही धर्मांतर विरोधी कायदा आणू आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हिंदूंच्या रक्षणासाठी ठोस कायदे करण्याचे काम सुरू आहे. आम्ही आमदार व मंत्री फक्त हिंदूमुळे बसलो आहोत त्यांनी आम्हाला मत दिले नाही आणि आम्ही त्यांच्याकडे मत मागायला देखील गेलो नाही.

# राहुरी व बारामती विधानसभा मतदारसंघांसाठी पोटनिवडणूक जाहीर

## मतदान २३ एप्रिलला तर ४ मे २०२६ रोजी मतमोजणी होणार

दैनिक आपला विदर्भ

मुंबई, दि. १५ : भारत निवडणूक आयोगाने देशातील सहा राज्यांतील आठ विधानसभा मतदारसंघांसाठी पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. यामध्ये महाराष्ट्रातील राहुरी (जि. अहिल्यानगर) आणि बारामती (जि. पुणे) या दोन विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे.

राहुरी मतदारसंघाचे आमदार शिवाजी भानुदास कर्डिले आणि बारामती मतदारसंघाचे आमदार अजित अनंतराव पवार यांच्या निधनामुळे या जागा रिक्त झाल्या असून त्यासाठी ही पोटनिवडणूक घेतली जाणार आहे.

निवडणूक आयोगाने या निवडणुकांसाठी आवश्यक कार्यक्रम जाहीर केला असून मतदानासाठी सर्व मतदान केंद्रांवर इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन आणि व्हीव्हीपॅट यांचा वापर करण्यात येणार आहे.

मतदारांची ओळख पटवण्यासाठी मतदार फोटो ओळखपत्र हा मुख्य पुरावा असेल. याशिवाय आधार कार्ड, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, पासपोर्ट, बँक किंवा पोस्ट ऑफिस पासबुक, मनरेगा जॉब कार्ड, आरोग्य विमा स्मार्ट कार्ड आदी कागदपत्रेही ग्राह्य धरली जाणार आहेत.

दरम्यान, निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच राहुरी आणि बारामती मतदारसंघात आचारसंहिता तत्काळ लागू झाली आहे. तसेच गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांची माहिती उमेदवार आणि राजकीय पक्षांनी प्रचार काळात तीन वेळा प्रसिद्ध करणे बंधनकारक असल्याचेही आयोगाने स्पष्ट केले आहे.

भारत निवडणूक आयोगाकडून जाहीर करण्यात आलेल्या कार्यक्रमानुसार मतदान २३ एप्रिल २०२६ रोजी होणार असून मतमोजणी ४ मे २०२६ रोजी केली जाणार आहे.


जाहीर कार्यक्रमानुसार ३० मार्च २०२६ (सोमवार) रोजी निवडणुकीसाठी राजपत्र अधिसूचना जारी केली जाईल. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ६ एप्रिल २०२६ (सोमवार) निश्चित करण्यात आली आहे. दाखल झालेल्या अर्जांची छाननी ७ एप्रिल २०२६ (मंगळवार) रोजी होणार आहे.

उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ९ एप्रिल २०२६ (गुरुवार) आहे. त्यानंतर संबंधित मतदारसंघांमध्ये २३ एप्रिल २०२६ (गुरुवार) रोजी मतदान पार पडेल.

मतदानानंतर ४ मे २०२६ (सोमवार) रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जाईल. तर संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ६ मे २०२६ (बुधवार) पर्यंत पूर्ण केली जाणार असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे.

या पोटनिवडणुकीसाठी निवडणूक आयोगाने सर्व यंत्रणांना आवश्यक तयारी करण्याच्या सूचना दिल्या असून आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

## शब्दकोडे क्र. 82



आडवे शब्द

१. झी मराठीवरील आणखी एक नायिकाप्रधान मालिका! ४. कडा दुमडलेली करंजी ७. मजेत रेंगाळत १२. इच्छित प्राप्तीची आज्ञा १३. मल्ल १५. हिंदीत पण-परंतु १६. कागदी चलन १७. हिंदी चित्रपटगीतात भेटणारा परमेश्वर १८. अंगावरील बारीक केस १९. पत्त्यातील जोडपे २१. असक्ती २२. लोकनाट्य २४. नामघोष २८. विशेष २९. मृत्तिकाकण ३१. जेमतेम ३३. शिकार ३६. कोळ्यांचा व्यवसाय ३८. शिव शिव ४०. काया व अंत:करण ४३. साडेतीन मुहूर्तांपैकी एक ४५. नवऱ्याची एखादी सवय वा वस्तूही बायकांना हिच्याप्रमाणे वाटू शकते! ४६. वडिलांचे इंग्रजी संबोधन ४७. भूगोलातील एक 'वृत्त' ४८. टॉनिकला आयुर्वेदातील शब्द ४९. शिखराचे टोक ५०. नित्य, सलग ५१. प्रामाणिक ५२. अभिप्राय ५४. निकट, जवळ ५६. पत्र ५८. धाड घालून पिक फस्त करणारा किडा ५९. विनासायास, विनाकारण ६२. छोटे कुबड ३. पाऊस (हिंदी) ६५. न वापरलेली ६६. इंद्रिय ६७. कंजूष ६९. मागणारा ७०. खून करणे, वध करणे ७३. बिनवासाचे पांढरे फूल ७५. रशिया (हिंदी) ७७. माणूस ७९. स्वप्नरंजनातील पहिला शब्द ८०. सैन्याचा मालपुरवठा ८४. यातनामय जिणे ८५. चार वेदांपैकी एक ८६. यथेच्छ

उभे शब्द

१. पौगंडावस्था २. धांदल, गडबड ३. एक ज्वालाग्रही सुगंधी पदार्थ ४. पानात उजवीकडे वाढले जाणारे पदार्थ, उदा.भाजी, इ. ५. नूतन ६. सिंह ७. रम्य ८. नंतर ९. होडी १०. शिवसेनेतील 'पंत' ११. किल्ल्याभोवतीची भिंत १४. शेवटचा सूर लांबवून बोलणे २०. सुकुमार २१. संधी २३. जनावरांची कत्तल करणारा २५. सोन्याचा धागा २६. नवरा २६अ. चांगला (अनेकदा उपरोधाने वापरला जाणारा शब्द) २७. वस्ती २८. कंड, खुमखुमी ३०. कुटुंब, गोतावळा ३१. छिद्रातून सांडणारे ऊन ३२. धैर्य, धाडस ३४. आशीर्वाद ३५. गप्प बसण्याचे व्रत ३७. मोहक, नशा आणणारे ३९. बारीक झणझण ४०. शोध, माग ४१. चेन्नईचे ब्रिटिशकालीन नाव ४३. परीक्षा घेणे, तपासणे ४४. व्यार्थ जाणारे, निरर्थक ४६. हालचालीवर ठेवलेली नजर ४७. स्वार्थ, हिंदीत अर्थ ४९. सरोज, पंकज ५१. वर्ष ५३. आक्षेप नाही या अर्थी प्रमाणपत्र ५७. पाण्याची जागा, जलाशय ५८. अणकुचीदार ५९. कारण ६०. ज्याप्रमाणे ६१. अनामत, गुंतविलेली रक्कम ६४. सिद्ध ६५. शेळीचे पिल्लू ६६. असाधारण ६८. सापाची एक जात ७१. धोबी ७२. संगीतातील एक राग ७४. उष्ण ७६. एक

### शब्दकोडे क्र. 81 चे उत्तर

आडवे उत्तर

१.चिरा ३.विसराळू ६.बापजादे १०.गोंगाट १२.मित्र १३.विहीण १४.शरयू १६.गडद १८.वसुधा २०.जोम २१.तूप २३.कीटक २५.लत २७.हाड २९.काळीज ३१.वीर ३२.वंद्य ३३.कवाड ३५.पोत ३६.गवत ३८.धग ३९.निवास ४०.खापर ४१.तूर ४२.क्रूर ४३.बाग ४४.घसट ४७.पतकरलेले ५०.नावडता ५१.कडा ५१अ.गप ५२.पोरकट ५४.बहीण ५५.रगड ५७.घट्ट ५८.खेळ ५९.वचा ६०.पापडी ६१.शर ६३.पाश ६४.उशीर ६५.टर ६६.पळवाट ६९.टकमक ७१.लाजाहोम ७४.वेणू ७५.काका ७७.वजा ७८.अटळ ७९.तुल्य ८०.चोर ८१.उडी ८३.वारू ८४.झेला ८५.खेळी ८६.मामा ८७.आभाळ ८८.बेघर

उभे उत्तर

१.चिराग २.डोंगा ४.समिधा ५.रात्र ६.बाही ७.पणतू ८.देश ९.वायू १०.गोंद ११.टवटवीत १३.विमल १५.रक्त १७.डहाळी १९.सुकर २२.पहाड २४.लवंग २६.तकवा २८.कातर २९.काडतूस ३०.जग ३४.वास ३५.पोपट ३७.वर्ण ३८.धरपकड ३९.निगरगट्ट ४०.खासदार ४३.बाक ४५.लवण ४६.म्हतारपण ४८.तडा ४८अ.लेप ४९.वाटचाल ५०.नाही कशी म्हणू तुला ५२.पोळपाट लाटणे ५३.कव ५६.गडी ५७.घर ६१.शरम ६२.ओळख ६५.टकळी ६७.टाहो ६८.हेका ७०.कवडी ७२.जाळ ७३.मगरूर ७६.काचोळी ८१.उमा ८२.रंभा ८३.वाघ

# चिखलीतील आठवडी बाजारात भीषण आगीमुळे ५ ते ६ दुकाने जळून खाक





**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** चिखली (जि. बुलढाणा) : शहरातील आठवडी बाजार परिसरात रविवारी अचानक भीषण आग लागून पाच ते सहा दुकाने जळून खाक झाल्याची घटना घडली. या आगीत व्यापाऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आठवडी बाजार परिसरातील भेळ सेंटर, बागवान यांचे फळांचे दुकान, घड्याळाचे दुकान तसेच इतर काही लहान व्यावसायिकांची दुकाने आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. अचानक लागलेल्या आगीमुळे परिसरात धुराचे मोठे लोट पसरले आणि नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाची गाडी तात्काळ घटनास्थळी दाखल झाली. जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून काही वेळात आगीवर नियंत्रण मिळवले. दरम्यान, घटनास्थळापासून अवघ्या सुमारे २०० मीटर अंतरावर पेट्रोल पंप असल्याने संभाव्य मोठा अनर्थ टळल्याची चर्चा परिसरात होत आहे.

घटनेची माहिती मिळताच आमदार श्वेता महाले यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली व व्यापाऱ्यांशी संवाद साधला. आग नेमकी कशामुळे लागली याचा तपास प्रशासनाकडून सुरू आहे.

## वृत्तविशेष...

## उधारी वसुलीला गेलेल्या पाच जणांना 'मुलं पळविणारी टोळी'चा संशय; नागरिकांकडून मारहाण, दोघे गंभीर

**दैनिक आपला विदर्भ**



**यवतमाळ/प्रतिनिधी :** Darwha तालुक्यातील Bori -rab येथील पाच जण उधारीचे पैसे वसूल करण्यासाठी Mukutban येथे गेले होते. संबंधित व्यक्ती घरी नसल्याने त्याच्या ओळखीतील Sanjay Pedkar याला हातपाय बांधून वाहनात कोंबून नेत असताना नागरिकांना संशय आला. कामटवाडा परिसरात वाहन थांबवून पाहणी केली असता एक व्यक्ती वाहनात कोंबलेल्या अवस्थेत आढळून आला. त्यामुळे नागरिकांनी त्यांना मुलं पळविणारी टोळी समजून वाहनाचा पाठलाग केला.

Ghantanji पोलीस ठाण्याच्या हद्दीतील Pandhurna जवळ वाहन अडवून नागरिकांनी संबंधितांना मारहाण केली. या घटनेत दोघांची प्रकृती गंभीर असून चार जण जखमी झाले आहेत. दरम्यान, या घटनेबाबत पोलिसांनी स्पष्ट केले आहे की, लहान मुलं पळविणाऱ्या टोळीबाबत सोशल मीडियावर पसरत असलेल्या अफवांवर विश्र्वास ठेवू नये, असे आवाहन Keshav Thakre यांनी केले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास घाटंजी पोलीस स्टेशन करीत आहे.

## ॲट्रॉसिटी कायद्याबाबत गैरसमज पसरवू नका; मंत्री संजय सिरसाट यांचे स्पष्टीकरण

**दैनिक आपला विदर्भ**




**छत्रपतीसंभाजीनगर/प्रतिनिधी :** ॲट्रॉसिटी कायद्याबाबत काही ठिकाणी गैरसमज पसरवले जात असल्याचे सांगत राज्याचे मंत्री संजय सिरसाट यांनी स्पष्टीकरण दिले आहे. ॲट्रॉसिटी कायद्यात कोणताही बदल करण्यात आलेला नसून तसे अधिकार आपल्या हातात नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कायद्याबाबत चुकीची माहिती पसरवली जात असल्याचेहीसंजय सिरसाट यांनी म्हटले आहे. तसेच दलित समाजावर होणाऱ्या अत्याचारांच्या प्रकरणांचा आढावा घेण्यासाठी आणि प्रलंबित प्रकरणांवर काम करण्यासाठी केंद्र सरकारच्या निर्देशानुसार आयोग स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. या आयोगाच्या अध्यक्षपदी आयपीएस अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार असून समाजाच्या हितासाठी हा आयोग काम करेल, असेही त्यांनी सांगितले.

## मुलासाठी कुणासोबत झोपावे लागले तरी... बिग बॉस फेम इन्फ्लुएंसर नेमकं काय म्हणाली?

**मुंबई/प्रतिनिधी :** वडा पाव गर्ल या नावाने चंद्रिका दीक्षितला रातोरात प्रसिद्धी मिळाली. ती सध्या आपल्या वैयक्तिक आयुष्यामुळे प्रचंड चर्चेत आहे. दरम्यान, चंद्रिका पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात अडकली आहे. तिचा एक व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल होत आहे. या व्हिडिओत तिनं अत्यंत आक्षेपार्ह विधान केलं आहे. तिनं आपल्या मुलाच्या संगोपनासाठी कोणत्याही थराला जाण्यास तयार असल्याचं सांगितलं. तिचं वक्तव्य सोशल मीडियात चर्चेत आलं आहे. यामुळे तिला काही जणांनी ट्रोल केलं आहे. वडा पाव गर्ल म्हणजेच चंद्रिका दीक्षित गेल्या काही दिवसांपासून मॅरेज लाईफमुळे चर्चेत आहे. पती युगम गेरासोबत तिचे नाते संपुष्टात येणार असल्याचं बोललं जात आहे. चंद्रिका आणि तिच्या पतीच्या नात्यात पडलेल्या दरारामुळे, ती आता दुसऱ्या लग्नामुळे चर्चेत आली आहे. ती लवकरच दुसरं लग्न करणार असल्याची माहिती आहे. दरम्यान, अलिकडेच तिनं केलेल्या एका वक्तव्यामुळे ती पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात अडकली आहे. तिनं एका पॉडकास्टमध्ये मुलाच्या संगोपनाबद्दल आणि आर्थिक अडचणींबद्दल सांगितले. तिनं केलेलं वक्तव्य ऐकून अनेकांना धक्का बसला.

## युद्धाची झळ आता खामगावपर्यंत पोहोचली; गॅस टंचाईमुळे पार्ले–जी बिस्किट उत्पादन ठप्प, ५०० कामगारांवर संकट

**दैनिक आपला विदर्भ**

बुलढाणा– इराणविरोधात अमेरिका आणि इस्त्रायलचं युद्ध सुरू असल्यानं आता थेट रोजगारावरदेखील परिणाम होण्याची भीती निर्माण झाली आहे. खामगाव येथील शिवांगी बेकर्स प्रा. लि. ही कंपनी पार्ले प्रॉडक्ट्सच्या प्रसिद्ध पार्ले–जी बिस्किटांचे उत्पादन करते. मात्र, व्यावसायिक गॅसच्या (एलपीजी) तीव्र टंचाईमुळे कंपनीचे उत्पादन गेल्या गुरुवारपासून (१२ मार्च २०२६ पासून) पूर्णपणे ठप्प झालं आहे.

जागतिक स्तरावर सुरू असलेल्या युद्धाचे पडसाद आता बुलढाण्यातील स्थानिक उद्योगांवर उमटू लागले आहेत. शिवांगी बेकर्समध्ये मुख्यतः क्रीम आणि ग्लुकोज प्रकारची पार्ले–जी बिस्किटे तयार केली जातात. कंपनीतील मोठे ओव्हन पूर्णपणे गॅसवर (एलपीजी) चालतात. जागतिक युद्धामुळे भारतात व्यावसायिक एलपीजी पुरवठा खंडित झाला आहे. सरकारने घरगुती आणि वाहतूक क्षेत्राला प्राधान्य दिल्यानं औद्योगिक क्षेत्राला गॅस मिळणं कठीण झालं आहे. परिणामी, शिवांगी बेकर्सला आवश्यक गॅस पुरवठा मिळाला नाही. त्यामुळे ग्लुकोज ओव्हनसह संपूर्ण उत्पादन प्रक्रिया थांबवावी लागली.

ग्लुकोज ओव्हन ११ मार्चपासून बंद – या कंपनीत सुमारे ५०० कामगार कार्यरत आहेत. उत्पादन बंद राहिल्यानं त्यांच्या कुटुंबांसमोर आर्थिक संकट निर्माण होण्याची भीती आहे. कामगारांचे पगार, भविष्य निर्वाह निधी आणि इतर सुविधांवर परिणाम होऊ शकतो. कंपनीचे संचालक अभय अग्रवाल यांनी सांगितलं की, ''आम्ही पार्ले कंपनीसाठी उत्पादन करतो. क्रीम आणि ग्लुकोज बिस्किटांचे उत्पादन होते. ग्लुकोज ओव्हन ११ मार्चपासून बंद आहे. कारण, एलपीजी पुरवठा खंडित झाला. लवकर गॅस मिळाला नाही तर कामगारांना मोठ्या अडचणींना सामोरं जावे लागेल.'' कंपनीला रोज लाखोंचे नुकसान होत आहे. उत्पादन दीर्घकाळ बंद राहिल्यास बाजारात पार्ले–जी बिस्किटांचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता आहे.

औद्योगिक क्षेत्र अडचणीत– गॅस टंचाईची समस्या फक्त खामगावपुरती मर्यादित नाही. संपूर्ण भारतात एलपीजी टंचाईमुळे इतर उद्योग बंद पडत आहेत. सरकारनं आयात वाढवण्याचा आणि घरगुती पुरवठा प्राधान्य देण्याचा प्रयत्न केला आहे. पण, औद्योगिक क्षेत्र अडचणीत आहे. स्थानिक स्तरावर कामगार संघटना आणि प्रशासनाकडून गॅस पुरवठा पूर्ववत करण्याची मागणी होत आहे. या संकटामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. कामगारांच्या कुटुंबांसाठी गॅसची टंचाई हे मोठे आव्हान ठरलं आहे. सरकार आणि कंपनीकडून लवकरात लवकर उपाययोजना अपेक्षित आहेत. अन्यथा ५०० कुटुंबांच्या उदरनिर्वाहावर प्रश्नचिन्ह उभे राहणार आहेत.

## चेंबूरमधील संतापजनक घटना; एका अल्पवयीन मुलीवर सामूहिक बलात्कार

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईत एक संतापजनक घटना समोर आली आहे. चेंबूरच्या टिळक नगर परिसरात एका अल्पवयीन मुलीवर सामूहिक बलात्कार झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी पोलिसांनी दोन नराधमांना अटक केली आहे. या घटनेमुळे मुंबईतील महिला आणि मुलींच्या सुरक्षितेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी आणि दोन्ही आरोपी हे गोवंडी येथील शिवाजी नगर परिसरातील रहिवासी आहेत. कामाच्या बहाण्याने आरोपींनी या अल्पवयीन मुलीला टिळक नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत बोलावून घेतले होते. तिला निर्जन ठिकाणी असलेल्या झुडपात नेऊन तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप पीडितेने केला आहे.

मुलीच्या जबाबाच्या आधारे पोलिसांनी तातडीने आफताब आणि अनिस नावाच्या दोन संशयितांना अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या दोघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता (ँए) आणि पोक्सो (इ्ध्एध्) कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या दोन्ही आरोपींना सोमवारी न्यायालयात हजर केले जाणार असून, त्यांना पोलीस कोठडी मिळण्याची शक्यता आहे.

या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करत आहेत.दुसरीकडे, बीडच्या परळी तालुक्यातून धक्कादायक प्रकार समोर आला आहे. परळी तालुक्यातील एका गावामध्ये एका सोळा वर्षीय मुलीवर दोघांनी अत्याचार केल्याची घटना काही दिवसांपूर्वी घडली होती. यामध्ये आरोपीने या मुलीला घरी बोलावून दुसऱ्या साथीदाराने तिचे हातपाय बांधत अत्याचार केले होते. या मुलीने याबाबतची माहिती कुटुंबीयांना दिल्यानंतर कुटुंबीयांनी याचा जाब आरोपींना विचारताच आरोपींनी त्यांना देखील शिवीगाळ करत धमकी दिली आहे. याप्रकरणी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस करत आहेत.

# पुण्यात मेट्रोचे २०० किमीचे जाळे उभारणार : मुख्यमंत्री

## पुणे मेट्रो भवनचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**दैनिक आपला विदर्भ**

पुणे, दि. १५ (जिमाका वृत्तसेवा) पुणे मेट्रो प्रकल्पामुळे शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला मोठी चालना मिळाली असून पुणेकरांनी मेट्रो सेवेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. सध्या दररोज सुमारे अडीच लाख प्रवासी मेट्रोचा वापर करत आहेत. भविष्यात पुणे महानगरपालिका, पिंपरी–चिंचवड महानगरपालिका आणि पीएमआरडीए क्षेत्राचा समावेश असलेले जवळपास २०० किलोमीटरचे मेट्रो जाळे उभारण्याचे नियोजन असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. वेगाने विकसित होणाऱ्या नागरी विकासाचा विचार करून पुणे मेट्रो आणि नगर विकास विभागाने या संपूर्ण नेटवर्कचे सविस्तर नियोजन तातडीने करण्याचे निर्देश त्यांनी दिले. त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाहीदेखील श्री.फडणवीस यांनी दिली.

पुणे शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला बळकटी देणाऱ्या पुणे मेट्रो प्रकल्पाच्या प्रशासकीय मुख्यालय असलेल्या 'मेट्रो भवन'चे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

या प्रसंगी उपमुख्यमंत्री तथा पुण्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार योगेश टिळेकर, भीमराव तापकीर, सुनील कांबळे, हेमंत रासने, बापू पठारे, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असीम गुप्ता, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार तसेच महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पुणे मेट्रो प्रकल्पाचे काम सुरुवातीला काही अडचणींमुळे उशिरा सुरू झाले असले तरी एकदा गती मिळाल्यानंतर अत्यंत वेगाने हा प्रकल्प पूर्ण करण्यात आला. देशातील सर्वाधिक गतिमानतेने पूर्ण होणाऱ्या मेट्रो प्रकल्पांमध्ये पुणे मेट्रोचा उल्लेख केला जातो. मेट्रो स्थानकांचे आधुनिक डिझाइन, मल्टीमॉडल कनेक्टिव्हिटी, प्रवासी सुविधा तसेच अत्याधुनिक तांत्रिक प्रणाली या सर्व बाबींमध्ये उत्कृष्ट नियोजन करण्यात आले आहे.

सध्या पुणे शहरात सुमारे ३३ किलोमीटरचा मेट्रो मार्ग कार्यान्वित झाला आहे. टाटा समूहाच्या सहकार्याने देशातील पहिल्या सार्वजनिक–खाजगी भागीदारी (पीपीपी) असलेल्या २३ किलोमीटरच्या मेट्रो प्रकल्पाचे कामही अंतिम टप्प्यात असून त्यापैकी १२ किलोमीटर मार्गाचे उद्घाटन मे महिन्यात, तर उर्वरित ११ किलोमीटर मार्ग जुलै महिन्यात सुरू करण्याचे नियोजन आहे. या दोन्ही प्रकल्पांसह पुण्यातील मेट्रोचे एकूण जाळे सुमारे ५६ किलोमीटरपर्यंत पोहोचणार आहे. याशिवाय आणखी ५५ किलोमीटरचे काम सुरू असून सुमारे ८० किलोमीटरचा विस्तार प्रस्तावित आहे. भविष्यात पुणे महानगरपालिका, पिंपरी–चिंचवड महानगरपालिका आणि पीएमआरडीए क्षेत्राचा समावेश असलेले जवळपास २०० किलोमीटरचे मेट्रो नेटवर्क उभारण्याचे नियोजन करण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले.

पुण्याचा वेगाने होणारा नागरी विकास लक्षात घेता या संपूर्ण २०० किलोमीटर नेटवर्कचे सविस्तर नियोजन तातडीने पूर्ण करावे, सर्व मार्गांचे डीपीआर एकत्रितपणे तयार करावेत तसेच भविष्यातील ग्रोथ सेंटर्स, नवीन विमानतळ, औद्योगिक क्षेत्रे आणि वाढती उपनगरे यांचा विचार करून मेट्रोचे जाळे विकसित करावे, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी महामेट्रो प्रशासनाला दिल्या. पुढील काळात जमिनीवर, आकाशात आणि भुयारी मार्गांद्वारे वाहतूक व्यवस्था विकसित करून पुणे शहर वाहतूक कोंडीरहित आणि शाश्वत शहर बनविण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.



पुणे मेट्रो भवन अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या, पुणे मेट्रो भवन केवळ प्रशासकीय मुख्यालय नसून आधुनिक पुण्याच्या प्रगतीचे प्रतीक आहे. अत्याधुनिक अभियांत्रिकी आणि सुयोग्य नियोजनाचा उत्कृष्ट नमुना असलेली ही इमारत पुण्याच्या प्रशासकीय वैभवात महत्त्वाची भर घालणारी ठरेल. पुणे मेट्रोसाठी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेल्या कामाचेही त्यांनी स्मरण केले.

मुळा–मुठा नदीकाठावर उभारलेले हे भवन पर्यावरणाशी सुसंगत अशा पद्धतीने विकसित करण्यात आले आहे. पुणे आणि पिंपरी–चिंचवड ही राज्याच्या विकासाची महत्त्वाची केंद्रे असल्याने येथे वाढत्या लोकसंख्येमुळे वाहतूक व्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाला होता. त्या पार्श्वभूमीवर महायुती सरकारने रिंग रोड, रुंद रस्ते, सेवा रस्ते, भुयारी मार्ग, पूल तसेच मेट्रोसारखे मोठे प्रकल्प राबवून वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी ठोस पावले उचलली असल्याचेही श्रीमती पवार यांनी नमूद केले.

स्वारगेटकात्रज, पिंपरी–चिंचवडभक्तीशक्ती चौक, वनाजचांदणी चौक, रामवाडीवाघोली, खडकवासलाखराडी, वारजेनळस्टॉप तसेच हडपसरसासवड आणि हडपसरलोणी काळभोर या महत्त्वाच्या मेट्रो मार्गांना गती देण्यात आली आहे. भविष्यात पुणे विमानतळ आणि चाकण एमआयडीसी यांनाही मेट्रोने जोडण्याचा विचार पुढे नेण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी प्रास्ताविकात पुणे मेट्रो प्रकल्पाची तसेच मेट्रो भवनमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या विविध सुविधांची माहिती त्यांनी दिली.

मेट्रो भवन, पुणे ठळक वैशिष्ट्ये ;

एकूण क्षेत्रफळ सुमारे८१५० चौ. मीटर.

भव्य स्वागत कक्ष व पुण्याच्या सांस्कृतिकवारशाचे दर्शन घडविणारी कला स्थापना.

अनुभव केंद्रात पुणे मेट्रोचे जाळे व प्रकल्पाची मॉडेल्स.

३१२ आसनक्षमतेचे सभागृह व बॅकअप संचालन नियंत्रण केंद्र, सिग्नलिंग व दूरसंचार सुविधा.

काच दर्शनी भागामुळे नैसर्गिक प्रकाश, ऊर्जा कार्यक्षम व पर्यावरणपूरक रचना.